अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १६३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## ‘शहीदांच्या रक्ताचा बदला घेणारच...’ युद्धाच्या धमकीने गल्फ कंट्रीत खळबळ

**तेहरान :** इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र मोजताबा खामेनी यांनी इराणच्या सत्तेचा ताबा अधिकृतपणे हाती घेतला आहे. सर्वोच्च नेते म्हणून नियुक्त झाल्यानंतर मोजताबा यांनी गुरुवारी पहिली प्रतिक्रिया देताना अमेरिका व इस्त्रायला ठणकावले. शहिदांच्या रक्ताचा बदला घेणारच, असा इशारा त्यांनी दिल्याने आखाती देशांमध्ये पुन्हा खळबळ माजली आहे. या संदेशात त्यांनी अमेरिका आणि इस्रायलवर आगपाखड करत, मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य करण्याची थेट धमकी दिली आहे. आपल्या पहिल्याच भाषणात मोजताबा खामेनी यांनी आक्रमक पवित्रा घेतला. ‘‘या भागातील अमेरिकेचे सर्व लष्करी तळ तत्काळ बंद केले पाहिजेत, अन्यथा त्यांच्यावर भीषण हल्ले केले जातील,’’ असा इशारा त्यांनी दिला. महत्वाचे म्हणजे, नियुक्तीनंतर मोजताबा अद्याप सार्वजनिकरीत्या लोकांसमोर आलेले नाहीत, मात्र त्यांच्या या लेखी संदेशाने पाश्चिमात्य देशांमध्ये खळबळ उडाली आहे.

# राष्ट्रवादीच्या उद्ध्वस्त गडावर भाजपचा झेंडा!




# जिल्ह्यात भाजपचे सभापती दहा

## पालकमंत्र्यांचा जादुई फंडा!

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील ११ पैकी तब्बल १० पंचायत समित्यांवर सभापती तर ७ ठिकाणी उपसभापती आणत भारतीय जनता पक्षाने या जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या उद्ध्वस्त गडावर आपला झेंडा दिमाखात रोवत विजयाचा ऐतिहासिक गुलाल उधळून जल्लोष केला. खास करुन सांगोला आणि पंढरपूर तालुक्यात या पक्षानं जादूई रणनितीचा ‘करिष्मा’ दाखवून दिला. सांगोल्यात भाजपचा केवळ एक सदस्य असताना सभापतीपद काबीज करुन इथली शेकापची तब्बल ५५ वर्षांची मक्तेदारी मोडित काढली. पंढरपुरात दोन्ही बाजूकडे समान संख्याबळ असतानाही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षांनाच फोडून इथं आपल्या पक्षाचा सभापती करुन भाजपने पुन्हा नवा इतिहास या तालुक्यात घडवला. या पक्षाच्यादृष्टीने सभापती निवडीत केवळ माळशिरस तालुक्याचा अपवाद राहिला.

### जिल्ह्यातील ७ ठिकाणी भाजपचाच सभापती

### दोन ठिकाणी अजित पवार राष्ट्रवादी, शिंदेसेनेला एका तालुक्यात संधी

मोहिते-पाटलांचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या माळशिरसमध्ये भाजपच्या विरोधात महाविकास आघाडी आणि महायुतीतील शिंदेसेना व अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्रित येऊन सत्ता आणली. दरम्यान याठिकाणी शिंदेंच्या शिवसेनेचे दत्ता मगर यांची सभापतीपदी तर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मनीषा पाटील यांची उपसभापती पदावर निवड झाली आहे. माळशिरस वगळता सर्व दहा पंचायत समितीवर भाजपने आपला सभापती बसविला असून सात ठिकाणी भाजपचाच उपसभापती तर दोन ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि एक ठिकाणी शिंदे सेनेचा उपसभापती झाला आहे.

### सोलापूर जिल्ह्यातील पक्षनिहाय सभापती अन् उपसभापती पदाचे ‘हे’ आहेत शिलेदार...

**१. अक्कलकोट (भाजप)**
सभापती : रश्मी सागर हिप्परगी
उपसभापती : सागर सिध्दप्पा कल्याणशेट्टी

**२. दक्षिण सोलापूर (भाजप)**
सभापती : संदीप अमृत टेळे
उसभापती : वर्षा सोमनाथ पटणे

**३. उत्तर सोलापूर (भाजप)**
सभापती : तेजस्विनी अमोल बोराडे
उपसभापती : सुनील दगडू भोसले

**४. मोहोळ (भाजप)**
सभापती : अस्लम गफूर चौधरी
उपसभापती : उल्का राजकुमार पाटील

**५. बार्शी (भाजप)**
सभापती : मीनाक्षी मुरलीधर रोंगे
उपसभापती : संतोष चंद्रकांत निंबाळकर

**६. करमाळा (भाजप-राष्ट्रवादी)**
सभापती : पूजा सचिन ढेरे
उपसभापती : अजिनाथ सर्जेराव विघ्ने (राष्ट्रवादी)

**७. माढा (भाजप)**
सभापती : पंडित तुकाराम देशमुख
उपसभापती : स्वाती हनुमंत गिड्डे (भाजप पुरस्कृत अपक्ष)

**८. मंगळवेढा (भाजप)**
सभापती : दीपाली आनंद ताड
उपसभापती : अर्जुन तुकाराम मल्लाळे

**९. सांगोला (भाजप-शिवसेना)**
सभापती : पूनम सुदर्शन इंगवले
उपसभापती : अजय उत्तम सरगर (शिवसेना)

**१०. पंढरपूर (भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष)**
सभापती : शुभम सुरेश आगावणे
उपसभापती : प्रमोद हरी देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष)

**११. माळशिरस (शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष)**
सभापती : दत्तात्रेय रावसाहेब मगर (शिवसेना)
उपसभापती : मनीषा अमोल पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष)

(अधिक वृत्त पान ७ वर...)

# काळ्या धनाच्या तस्करीत पाणी मुरलं कुठं?

## तीन वर्षाच्या संशयास्पद प्रवासानंतर गुन्हा दाखल

**सोलापूर/प्रतिनिधी**

**सन २०२३ ला तस्करी उघड**
**२०२५ ला पंचनामा अन् २०२६ मध्ये गुन्हा दाखल**

उपळाई बुद्रूक (ता. माढा) शिवारातील सरकारी जमिनीतून तब्बल १२ लाख ५९ हजार %०० रुपयांचा मुरूम अवैधरीत्या उपसा केल्याप्रकरणी माढा पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा प्रकार २०२३ मध्ये घडला, त्यानंतर २०२५ मध्ये पंचनामा करण्यात आला आणि अखेर २०२६ मध्ये माढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला, या विलंबामुळे महसूल प्रशासनाच्या कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तस्करीच्या गुन्ह्यासंबंधीच्या तीन वर्षाच्या संशयास्पद प्रवासानंतर गुन्हा दाखल करण्यामागे दडलंय काय? हा मुद्दा उपस्थित केला जात आहे.

**तीन वर्षांची बाराभानगड**

दरम्यान, या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे ही घटना २०२३ मध्ये घडली असताना महसूलमंत्र्यांच्या आदेशानंतर जून २०२५ मध्ये महसूल प्रशासनाने घटनास्थळी पंचनामा केला. त्यानंतरही तब्बल आठ महिन्यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे अवैध मुरूम उत्खननाच्या या प्रकरणात नेमके पाणी मुरते कुठे? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थितकेला जातोय.


विशेषत्वे, काळे धन समजल्या जाणाऱ्या वाळू तस्करींच्या या प्रकरणात कारवाईच्या पार्श्वभूमीवर, पाणी मुरलं कुठं? असा सवाल पर्यावरणप्रेमींकडून उपस्थित केला जात असून याप्रकरणी चर्चा माढा तालुक्याच्या ग्रामीण भागात चांगलीच रंगली आहे. माढा शेटफळ मार्गालगत गालीशाबाबा दर्याजवळील गट क्रमांक ३०६ मधील सरकारी जमिनीतून मोठ्या प्रमाणात

(अधिक वृत्त पान ७ वर...)

**सोलापूर शहराचे तापमान**
कमाल तापमान
३९.१

# व्यावसायिक सिलेंडरांचा निर्णय ‘गॅस’वरच

## वरिष्ठ पातळीवर चर्चेचा ‘सिलसिला’, प्रशासनाचे हात अडलेलेच!



- घरगुती सिलेंडर देण्याला प्राध्यान्य देण्याचा निर्णय
- दवाखाने, आश्रमशाळा आदींना लवकरच मिळणार सिलेंडर टाक्या

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहर-जिल्ह्यातील साधारण १० हजार ८०० व्यावसायिक गॅड सिलेंडरांचा पुरवठा करण्याचा निर्णय अद्यापही ‘गॅस’वरच आहे. या टाक्यांचा पुरवठा करण्यासंदर्भात सोलापूर जिल्हा पुरवठा विभागाला कोणतेही आदेश नाहीत. उलट बुकिंग बरोबरच पुरवठादेखील वरील आदेश येईपर्यंत बंद ठेवा, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. मात्र दुसऱ्या बाजूला सर्वसामन्य नागरिकांची घरगुती गॅस सिलेंडरवाचून कोणत्याही हेडसांड होऊ देऊ नये, असेही निर्दे श राज्याच्या मुख्य सचिवांनी पुरवठा विभागाला गुरुवार (ता.१२) रोजी दिले आहेत.

विशेषत्वे, दवाखाने, आश्रमशाळा, अंगणवाड्या त्याशिवाय अत्यावश्यक सेवा या ठिकाणी मात्र लवकर व्यावसायिक गॅस सिलेंडर पुरवण्यासंदर्भात निर्णय होईल, त्यानुसार, पुरवठा करण्यासाठी सज्जता ठेवा, असेही निर्देश मंत्रालय स्तरावरुन गुरुवारी राज्य मुख्य सचिवांनी दिले आहेत. या संदर्भात माहिती सोलापूर जिल्ह्याचे पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दैनिक ‘सुराज्य’ला दिली. सोलापूर शहर अन् जिल्ह्यातील हॉटेल, बार, रेस्टॉरंट, भोजनालयं, ढाबे तसेच लघु-मध्यम उद्योगांवर शनिवार (ता.७) पासून आलेले गॅस सिलेंडरच्या टंचाईचे सावट कायम आहे. दूसऱ्या बाजूला पाकणी (ता.उत्तर सोलापूर) इथल्या बल्क डेपोमध्ये सिलेंडर भरलेल्या लोडच्या गाड्या जागेवरच थांबून आहेत, पुरवठा करण्याच्या साखळीसाठी त्यांना गिअर पडेना हे वास्तव असल्याचे सांगण्यात आले. अद्याप साधारण १० हजार ८०० व्यावसायिक गॅस टाक्यांचे बुकिंग बंदच आहे. येत्या सोमवार (ता.१६) पासून प्रत्यक्ष सिलेंडरचा पुरवठा होण्यासाठी हालचाली होतील.

**पाकणीच्या बल्क डेपोत दोन महिने पुरेल इतका इंधनसाठा**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यासह राज्यभरात अनेक ठिकाणी पाकणी बल्क डेपोतून पेट्रोल, डिझेल या इंधनाचा पुरवठा होतो. मागणीच्या प्रमाणात सध्या इंधनाचा पुरवठा सुरु आहे. पुढील दोन महिने पुरेल इतका इंधन साठा पाकणीच्या बल्क डेपोत असल्याने ग्राहकांनी पॅनिक करु नये, इंधनासाठी रांगा लावू नयेत, अफवांवर विश्वास ठेऊ नये. इंधन साठा करण्याची गरज नाही, अशी माहिती पेट्रोल-डिझेल विक्रेते असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सिद्धेश्वर वाले यांनी दैनिक ‘सुराज्य’ला गुरुवारी सांगितले.

**तिसरा डोळा**
– प्रकाश पोरे



होरपळ !

कल्याण
260-88-134
मुंबई
458-79-469
3 7 9

# ओबीसी ‘क्रिमीलेयर’साठी पालकांचे वेतन एकमेव निकष ठरत नाही

**नवी दिल्ली**

यूपीएससी उमेदवारांना मिळणार आरक्षणाचा लाभ. नवी दिल्ली- इतर मागासवर्गीय अर्थात ओबीसी आरक्षणातील ‘क्रिमीलेयर’ ठरवताना केवळ पालकांचे वेतन किंवा उत्पन्न हा एकमेव निकष ठरू शकत नाही, असा महत्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. वेतनाच्या आधारावर उमेदवाराला सरसकट क्रिमीलेयरमध्ये टाकणे हे घटनात्मक आरक्षण धोरणाच्या उद्देशाला बाधक ठरू शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या निर्णयामुळे शेकडो यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण ओबीसी विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

न्या. आर. महादेवन आणि न्या. पी.एस. नरसिंहा यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारच्या विविध अपिलांवर एकत्रित निकाल देताना हा निर्णय दिला. या प्रकरणांमध्ये नागरी सेवा परीक्षेतील काही उमेदवारांना ओबीसी (नॉन क्रिमीलेयर) लाभ नाकारण्यात आला होता. केंद्र सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने (डीओपीटी) काही उमेदवारांच्या पालकांचे वेतन आठ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्याचा आधार घेत त्यांना क्रिमीलेयरमध्ये समाविष्ट केले. त्यामुळे त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ नाकारण्यात आला. मात्र, संबंधित उमेदवारांनी दावा केला की, ओबीसी क्रिमीलेयर ठरवण्यासाठी वेतन हा एकमेव निकष नसून सामाजिक स्थिती आणि इतर घटकांचाही विचार आवश्यक आहे. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण (कॅट) आणि विविध उच्च न्यायालयांनी उमेदवारांच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात नमूद केले की, ८ सप्टेंबर १९९३ च्या आदेशात ओबीसी क्रिमीलेयर ठरवण्यासाठी ठरवलेले निकष स्पष्ट आहेत. त्या आदेशानुसार उत्पन्न व संपत्ती चाचणी करताना वेतन आणि कृषी उत्पन्न एकत्र करून विचारात घेता येत नाही. त्यामुळे २००४ मधील पत्राद्वारे वेतन उत्पन्नाचा विचार करण्याचा प्रयत्न कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरता येणार नाही.



**सुप्रीम कोर्टाचा महत्वपूर्ण निर्णय**

**अतिरिक्त पदे निर्माण करा**

न्यायालयाने संबंधित उमेदवारांबाबत ओबीसी नॉन-क्रिमीलेयर निकषांनुसार पुनर्विचार करावा, असे निर्देश दिले तसेच पात्र उमेदवारांना आवश्यक असल्यास अतिरिक्त पदे निर्माण करून सेवा वाटप करावे, असे सांगितले. संपूर्ण प्रक्रिया सहा महिन्यांच्या आत पूर्ण करावी, असे निर्देशही न्यायालयाने दिले.

**२००४ चा आदेश अमान्य**

या निर्णयात न्यायालयानं कार्मिक व प्रशिक्षण विभागाच्या २००४ च्या पत्रातील पॅरा ९ अमान्य ठरवला आहे. या पत्रात बँक, खासगी क्षेत्र आणि सार्वजनिक उपक्रमांतील कर्मचाऱ्यांच्या पगाराला क्रीमी लेयरमध्ये समाविष्ट करण्याचा उल्लेख होता. न्यायालयानं हा नियम भेदभावपूर्ण असल्याचं सांगत तो रद्द केला.

**काय काय बदल होतील**

एखादा उमेदवार क्रीमी लेयरमध्ये येतो की नॉन-क्रीमी लेयरमध्ये, याचा निर्णय फक्त त्याच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या आधारावर घेता येणार नाही, असे न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. या निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाशी संबंधित नियमांमध्ये महत्वाचे बदल झाले आहेत. न्यायालयाने सांगितलं की, क्रीमी लेयर ठरवताना फक्त पालकांची सॅलरी किंवा उत्पन्न विचारात घेता येणार नाही. त्याऐवजी १९९३ मधील मूळ मार्गदर्शक तत्वांनुसार पदाची स्थिती आणि इतर घटकही विचारात घ्यावे लागतील.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की जर उमेदवाराचे पालक सरकारी नोकरीत ग्रुप किंवा ग्रुप (क्लास किंवा) मध्ये असतील, तर त्यांचा पगार क्रीमी लेयर ठरवताना गणनेत धरला जाणार नाही. तसेच शेतीतून होणाऱ्या उत्पन्नालाही पूर्णपणे वगळण्यात आले आहे. क्रीमी लेयर ठरवताना व्यवसाय, मालमत्ता, भाडे इत्यादी इतर स्रोतांमधून येणाऱ्या उत्पन्नाचा विचार केला जाईल. ही सरासरी सलग तीन वर्षांसाठी वार्षिक ८ लाख रुपयांपेक्षा कमी असावी.